माहितीचा अधिकार

राज्य माहिती आयोग, महाराष्ट्र
बृहन्मुंबई खंडपीठ

माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये दाखल झालेले अपील

अपील क्र. MHSICMU/२०२६/M/०००११६

अपिलार्थी श्री. विरेंद्रसिंह वीणा भोजराजसिंह वाघेला

विरुद्ध

जन माहिती अधिकारी तथा सहाय्यक पोलीस आयुक्त
माहिम विभाग, माहिम पोलीस ठाणे आवार, मुंबई-४०० ०१६

प्रथम अपिलीय अधिकारी तथा पोलीस उप आयुक्त (परिमंडळ-५)
सागरी पोलीस ठाणे, २ रा माळा, माहिम रेती बंदर,
माहिम डेपो समोर, मुंबई ४०० ०१६.

द्वितीय अपील अर्ज सुनावणी दिनांक : १४.१०.२०२६

अपीलकर्ता : उपस्थित
विद्यमान जन माहिती अधिकारी : उपस्थित(प्रतिनिधी)
प्रथम अपिलीय अधिकारी : अनुपस्थित

मूळ अर्ज दिनांक	जन माहिती अधिकाऱ्याचा उत्तराचा दिनांक	प्रथम अपील दिनांक	प्रथम अपील आदेश दिनांक
२८.१०.२०२५	२९.११.२०२५	०८.१२.२०२५	१६.१२.२०२५

अपिलार्थी यांनी आयोगाकडे दि. १२.०१.२०२६ रोजीच्या अर्जान्वये माहिती मिळालेली नाही असे कारण नमूद करुन द्वितीय अपील दाखल केले आहे.

द्वितीय अपील अर्जासोबत अपिलार्थी यांनी जन माहिती अधिकारी यांचे पत्र दि. २९.११.२०२५ व प्रथम अपिलीय अधिकारी यांचे आदेश दि. १६.१२.२०२५ संलग्न केले आहेत.

२. अपिलार्थी यांनी दि. २८.१०.२०२५ रोजीच्या माहिती अर्जानुसार पुढील माहितीची मागणी केली होती:- *(१) "मिळालेली माहिती १५६०४/२०२५ दि. १६.१०.२०२५ रोजी श्री. कांतीलाल रावल विरूध्द केलेली तकार खोटे जन्माचा दाखला विरूध्द तक्रार अर्जाची चौकशी बंद करण्यात करिता धारा ४(१)(b)३,४,५ अंतर्गत ज्या ज्ञानचा वापर केले आहे. ज्याचा आधारे निर्णय घेण्यात आले ते ज्ञान / माहिती लोकांना माहित असणे गरजेचा आहे. ते ज्ञान लेखित स्वरूपात प्रमाणित प्रत देण्यात यावे.*
(२) माहिम पोलीस चौकीत सादर केलेला जन्माचा दाखला B१८४८ दि. २८.०२.२०२५ आणि BMC ने सादर केलेला जन्माचा दाखला क्र. १४९८८ दि. २६.०६.२०२५ रोजीमध्ये फेरफार आहे किंवा नाहीची माहितीची प्रमाणित प्रत द्यावी."

३. जन माहिती अधिकारी यांनी दि. २९.११.२०२५ रोजी अपिलार्थींना मुद्दा क्र. (१) बाबत कळविले की, अर्जदार यांनी मागणी केलेल्या माहितीच्या अनुषंगाने तकार अर्जाची चौकशी करताना चौकशी पूर्ण झालेवर दखलपात्र किंवा अदखलपात्र गुन्हा निष्पन्न होत असेल तर त्या अनुषंगाने पुढील कायदेशीर कारवाई केली जाते. तसेच कोणताही दखलपात्र किंवा अदखलपात्र गुन्हा होत नसेल तर अर्जदार यांना सूचित करण्यात येते.

मुद्दा क्र. (२) बाबत कळविले की, नमुद जन्माचे दाखले हे खरे आहेत किंवा खोटे आहेत हे ज्या विभागाने दाखले दिलेले आहेत तो विभाग सांगू शकतो त्यामुळे अर्जदार यांनी वैदयकीय आरोग्य अधिकारी BMC यांचे कार्यालयाशी संपर्क करावा.

४. अपिलार्थींचे समाधान न झाल्याने त्यांनी दि. ०८.१२.२०२५ रोजी प्रथम अपील दाखल केले. प्रथम अपिलीय अधिकारी यांनी दि. १६.१२.२०२५ रोजी जन माहिती अधिकारी यांनी अपिलार्थींना दिलेली माहिती योग्य आहे असे नमुद करुन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

५. सुनावणीच्या वेळी अपिलार्थी व जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी उपस्थित असून जन माहिती अधिकारी यांचे प्रतिनिधी यांनी जन माहिती अधिकारी यांचे लेखी निवेदन दि. १३.१०.२०२६ आयोगासमोर सादर करुन नमुद केले की, त्यांनी अपिलार्थींना मुद्देनिहाय उत्तर कळविलेले आहे. तसेच, प्रथम अपिलीय अधिकारी यांनी सुनावणी घेऊन प्रथम अपील निकाली काढलेले आहे.

६. या अपिलासंदर्भातील कागदपत्रांचे अवलोकन केल्यावर तसेच युक्तिवाद ऐकून घेतल्यानंतर आयोग या निष्कर्षावर येत आहे की, अपिलार्थींना उत्तर देण्यात आलेले आहे. सबब आयोग पुढील आदेश देत आहे:

आदेश

अपील निकाली काढण्यात येत आहे.

State Information Commission Greater Mumbai

मुंबई
दिनांक : १५.१०.२०२६

15-10-2026
(डॉ. प्रदीप व्यास)
राज्य माहिती आयुक्त, बृहन्मुंबई